श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

| डिसेंबर २०२१ | अंक आठवा | खासगी वितरणासाठी | पाने १६ |

## डेरवण येथे थेरप्युटिक सेल कल्चर सुविधेचे उद्घाटन




*उद्घाटनप्रसंगी बोलताना श्री. विकासराव वालावलकर, सोबत डॉ. ऋता मुल्हेरकर आणि डॉ. सुनील नाडकर्णी*

भ.क.ल. वालावलकर रुग्णालय आणि संशोधन केंद्र, आणि भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, श्रीक्षेत्र डेरवण (सावर्डे) येथे 'समर्थकृपा लाइफ सायन्सेस प्रायव्हेट लिमिटेड'(Samartha Krupa Life Sciences Pvt. Ltd. - SKLS) ने 'थेरप्युटिक सेल कल्चर' सुविधा सुरू केली आहे. त्याचे उद्घाटन दि. ८ ऑक्टोबर २०२१ रोजी भारत सरकारच्या शास्त्र आणि तंत्रज्ञान मंत्रालयाच्या बायो-टेक्नॉलॉजी विभागाच्या मुख्य सचिव (Department of Biotechnology (DBT), Ministry of Science and Technology, Government of India), डॉ. रेणू स्वरूप यांच्या हस्ते दूरदृश्य-प्रणालीद्वारे झाले. या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर हेही दूरदृश्य-प्रणालीद्वारे उपस्थित राहिले.

समारंभाच्या प्रारंभी 'समर्थकृपा लाइफ सायन्सेस'(SKLS)चे संचालक श्री. विकासराव वालावलकर यांनी सर्वांचे स्वागत करून या प्रकल्पाविषयी माहिती दिली. ते म्हणाले, ''आमची कंपनी 'समर्थकृपा लाइफ सायन्सेस'साठी आजचा दिवस हा फार महत्त्वाचा आहे कारण आज "Therapeutic Cell Culture Facility" चे उद्घाटन होत आहे. ही सुविधा दक्षिण महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यात भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाच्या परिसरात सुरू होत आहे. त्याबाबतीत आमच्या या 'सेल कल्चर फॅसिलिटी'चे 'स्थान' एकमेवाद्वितीय आहे असे म्हणता येईल.

ज्या ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाच्या परिसरात ही सुविधा सुरू होत आहे, ते 'श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट'ने स्थापित केलेले आहे. त्यामुळे तो ट्रस्ट आणि त्याचे कार्य याविषयी सन्माननीय प्रेक्षकांना थोडक्यात माहिती देणे योग्य होईल असे मला वाटते.

कोकणातील मध्यवर्ती अशा या भागात सुमारे बावन्न वर्षांपूर्वी एक मोठा सामाजिक प्रयोग सुरू झाला. समाजाची सर्वांगीण सुधारणा करून त्याला सक्षम आणि बलशाली बनविणे आणि त्याद्वारे राष्ट्र समृद्ध आणि बलशाली बनविणे हा त्या मागील विचार होता. हे स्वप्न साकार व्हावे म्हणून आमचे सद्गुरू श्रीसहजानंदसरस्वती स्वामी

महाराज यांनी 'श्रीसंत सीतारामबुवा चॅरीटेबल ट्रस्ट' आणि 'श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट' या दोन ट्रस्टची स्थापना करून एक अनोखा प्रयोग सुरू केला. स्थापनेपासूनच हे दोन्ही ट्रस्ट सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रात सेवाकार्य करीत आहेत.

श्रीसहजानंदसरस्वती महाराज हे संत होते. 'अशनं वसनं वास: येषां चैवा व्यवस्थितम् । मगधेन समा काशी गंगाप्यंगारवाहिनी ।।' या वचनाचा ते संदर्भ देऊन सांगत की ज्याला अन्न, वस्त्र, निवारा यासारख्या मुलभूत गोष्टीही मिळत नसतील तर त्याला अध्यात्मावर प्रवचन ऐकविण्यात काही अर्थ नाही. अशा माणसाला जुलमी मगधदेश काय आणि पवित्र काशी काय, गंगा काय आणि शेजारचा ओहोळ काय, सगळेच सारखे वाटणार. थोडक्यात, माणसाच्या अन्न, वस्त्र, निवार, रोजगार, शिक्षण, आरोग्य अशा गरजा भागविल्याशिवाय त्याला आध्यात्म आणि मानवधर्माविषयी प्रवचन देणे निरुपयोगी आहे. आणि हे लक्षात घेऊनच ट्रस्ट गेली ५० वर्षे कार्य करीत आहे.

या वाटचालीत आर्थिक दृष्ट्या दुर्बल लोकांना, विशेषत: या परिसरात राहणाऱ्या लोकांना अत्याधुनिक आरोग्य सेवेचा लाभ मिळवून देणे; तेही त्यांना परवडेल अशा दरात आणि त्यांच्या परिसरात हे अत्यंत गरजेचे वाटले. म्हणून ट्रस्टने ६० खाटांचे रुग्णालय १९९६ साली सुरू केले आणि मग ते ३०० खाटांचे झाले आणि आता त्याचा विस्तार ६५० खाटांच्या रुग्णालयात झाला आहे. रुग्णालयात सर्व प्रकारच्या रुग्णचिकित्सेची सोय असून कॅथ-लॅब, एम.आर.आय., सी.टी. स्कॅन, Indian council of Medical Research (ICMR) ची मान्यता असलेली कोविडचे परिक्षण करणारी व्हायरॉलॉजी लॅब आदी सोयी आहेत.

मात्र या रुग्णालयाचा उद्देश केवळ गरजू रुग्णांना वैद्यकीय उपचार देणे एवढाच मर्यादित नसून ग्रामीण भागातील लोकांमधे आरोग्यविषयक जाणीव निर्माण करणे हेही अभिप्रेत आहे. म्हणूनच 'लाडू-गोपाळ योजना', 'यशोदा योजना', 'सुकन्या योजना', 'सुदामा योजना' अशा अनेक योजना सुरू करण्यात आल्या आहेत. या योजनांचे उद्दिष्ट किशोरवयीन मुली, गरोदर माता आणि तान्ही बाळे यांचे आरोग्य सुधारावे हे आहे.

ट्रस्ट एक इंग्रजी माध्यमाची CBSE अभ्यासक्रम शिकविणारी 'ज्यु. के. जी.' पासून १२ वी पर्यंतची शाळा चालवितो. या शाळेत ९०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मुलांना आधुनिक शिक्षण देणे एवढाच मर्यादित उद्देश न ठेवता त्यांना उत्तम संस्कारांचीही शिकवण मिळावी, आणि केवळ सुशिक्षित न होता खऱ्या अर्थाने सुसंस्कृत व्हावेत यासाठी प्रयत्न केले जातात.

या भागातील मुलींना परिचारिकेचे शिक्षण मिळावे, त्यांना शहरातील रुग्णालयातूनही नोकऱ्या मिळाव्यात आणि त्यांनी आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण व्हावे यासाठी समर्थ नर्सिंग स्कूलची स्थापना करण्यात आली आहे. ट्रस्टने एक क्रीडासंकुलही उभे केले आहे. तेथे मुलांना तरणतलाव, आठ लेनचा ४०० मि.चा रनिंग ट्रॅक, ॲथलेटिक्स रिंग, बंदिस्त शूटिंग रेंज आणि जिम्नॅस्टिक हॉल इत्यादी सोयी उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

या सगळ्यामुळे, या परिसरातील लोकांची खूप प्रगती झाली आहेच, पण २०१५ साली सुरू झालेल्या ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयामुळे येथील कामाला खूपच गती आली आहे. आजच्या समारंभाचे प्रमुख पाहुणे आणि आमच्या शास्त्रीय सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. काकोडकर यांनी सर्वप्रथम वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याची सूचना केली होती. ट्रस्टच्या कार्यात त्यांचा मोलाचा सल्ला आम्ही नेहमीच घेत असतो.

आमचे रुग्णालय हे टाटा मेमोरिअल हॉस्पिटलचे 'आऊट रिच सेंटर' आहे. टाटा मेमोरिअल हॉस्पिटल हे भारत सरकारच्या अणुशक्ती विभागाच्या अखत्यारीत येते. त्या संदर्भात डॉ. काकोडकरांनी काही वर्षांपूर्वी डेरवणला रुग्णालयाला भेट दिली होती. त्या वेळी ते संस्थेचा परिसर पाहून म्हणाले होते की येथे जर मेडिकल कॉलेज सुरू केले तर येथील वैद्यकीय सोयीसुविधांची लक्षणीय प्रगती होईल आणि त्यामुळे परिसरातील सामान्य माणसाचा अनेक प्रकारे फायदा होईल आणि या भागाची आर्थिक प्रगतीही होईल. त्यांचे भाकीत खरे ठरल्याचा प्रत्यय आता आम्हाला येत आहे. मेडिकल कॉलेज सुरू होण्यापूर्वीच्या येथील आरोग्यविषयक सोयी-सुविधा आणि आर्थिक पातळीमध्ये अनेक पटीने आता वाढ झाली आहे. त्यांच्या या महत्त्वाच्या आणि योग्य वेळी केलेल्या सूचनेबद्दल आम्ही त्यांचे सदैव ऋणी आहोत. धन्यवाद डॉ. क़ाकोडकर !

आमच्या वैद्यकीय सेवा अधिक कार्यक्षम आणि परिणामकारक होण्यासाठी स्थानिक समस्यांचे स्थानिक पातळीवर निराकरण व्हावे या उद्देशाने आमच्या संस्थेतच बहुशाखीय संशोधन आणि नवीन उपक्रम यावर आम्ही भर देत आहोत. त्यासाठी आम्ही 'समर्थकृपा लाइफ सायन्सेस' ही 'स्टार्ट-अप'कंपनी २०१८ साली सुरू केली आहे. वैद्यकीय क्षेत्रात अत्याधुनिक संशोधन आणि सुधारणा करणे आणि त्याला दीर्घकालीन स्वरूप प्राप्त होण्यासाठी ते आर्थिकदृष्ट्या किफायतशीर होईल अशा पद्धतीने करणे यासाठी 'समर्थकृपा लाइफ सायन्सेस' प्रयत्नशील राहणार आहे.''

यानंतर 'समर्थकृपा लाइफ सायन्सेस'चे दुसरे संचालक डॉ. सुनील नाडकर्णी यांनी आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले, 'समर्थकृपा लाइफ सायन्सेस' स्थानिक प्रश्नांवर नावीन्यपूर्ण उत्तरे शोधण्यासाठी संशोधनावर लक्ष केंद्रित करीत आहे. अत्युत्कृष्ट दर्जाच्या संशोधनाचा लाभ रुग्णशय्येपर्यंत उपलब्ध करून देणे हे आमचे उद्दिष्ट आहे. आमच्या चार वैशिष्ट्यांमुळे आमचे स्थान एकमेव झाले आहे. १) ग्रामीण भागातील रुग्णालयातून दिली जाणारी वैद्यकीय सेवा



डॉ.सुनील नाडकर्णी

२) आमच्या 'आउट-रिच' कार्यक्रमातून होणारा व्यापक सामाजिक संपर्क ३) वैद्यकीय महाविद्यालयाद्वारा वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन आणि ४) 'स्टार्ट-अप'द्वारा नावीन्यपूर्ण उत्पादन. आणि हे सगळे सावर्डे येथे एकाच छत्राखाली आहे! आत्ता आम्ही 'समर्थकृपा लाइफ सायन्सेस'द्वारा वैद्यकीय सेवा, वैद्यकीय उपकरणे आणि विविध रोग आणि आजार या गोष्टींशी संबंधित समस्या सोडविण्यावर भर देत आहोत.

कोविडच्या साथीच्या काळात आम्ही 'सॅनिटायझर'चा एक पर्याय अल्प किमतीत तयार केला. प्लाझ्मा आणि हैड्रोजन पेरॉक्साईड यांचा वापर करून 'अल्ट्रासोनिक नेब्युलायझेशन'ने या उपकरणात विविध वैद्यकीय उपकरणे किंवा इतर वस्तू अत्यंत कमी वेळात निर्जंतूक करण्याची सोय असून अन्य रासायनिक 'सॅनिटायझर'पेक्षा याची किंमतही अत्यंत कमी आहे. नेहमीच्या 'हॉट स्टरलायझेशन' प्रक्रियेत एन्डोस्कोपसारखी किंमती उपकरणे साफ करता येत नाहीत. त्यासाठीही याचा वापर करता येतो. याच काळात आम्ही 'श्लेष्मल प्रतिकारशक्ती' (Mucosal IgA based immunity) वरही संशोधन केले. लक्षणे न दिसणाऱ्या (asymptomatic) रुग्णांची 'श्लेष्मल प्रतिकारशक्ती'(Mucosal immunity) चांगली असावी हा आमचा तर्क होता आणि त्यामुळे कोविडचे निदान करणे, त्यापासून संरक्षण करणे आणि त्यावर उपचार करणे यासाठी आम्ही आमची अशी उपचारपद्धत विकसित केली.

हातात धरून वापरायच्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या वाढत्या वापरामुळे पाठ आणि मानदुखी हे जगभर भेडसावणारे प्रश्न झाले आहेत. 'लॉक-डाऊन'च्या काळात ऑन-लाइन कामे आणि अभ्यास यासाठी इलेक्ट्रॉनिक्सच्या उपकरणांचा वापर तरुण आणि वृद्ध अशा दोघांकडूनही बराच वाढला आणि त्यामुळे हा प्रश्न अधिकच बिकट झाला. या प्रश्नाचे structural failure of the intervertebral disc असे ठाम शास्त्रीय निदान करता येईल, त्याचे परिणामस्वरूप म्हणजे मणक्याच्या चकतीच्या पेशी हळूहळू खराब होतात. ही चकती शस्त्रक्रियेने काढून टाकणे ही झाली सर्वसाधारणपणे वापरली जाणारी उपचार पद्धती. जगभर प्रतिवर्षी सर्व देशात मिळून अशा लाखो शस्त्रक्रिया होतात. गेल्या दोन दशकात दुर्बिणीद्वारे अशी शस्त्रक्रिया करण्याचे तंत्र विकसित झाले आहे आणि त्यामुळे 'मर्यादित भूल' देऊन आणि टाके न घालता ही शस्त्रक्रिया करता येते. आता त्या चकतीची कार्यक्षमता रुग्णाच्या मणक्यात पुनरुत्पादक पेशी (autologous regenerative cells) वापरून दीर्घकाळासाठी वाढवता येते. आम्ही काढून टाकलेल्या चकत्यांमधून पुनरुत्पादक पेशी वेगळ्या करण्यात यश मिळवले आहे. अशा वेगळ्या केलेल्या पेशी पेशंटच्या खराब झालेल्या चकतीत वापरल्यास त्याद्वारे अशा चकतीची कार्यक्षमता सुधारता येते. अशा पेशी वाढविण्यासाठी अतिशय महागडे Fetal Bovine Serum हे रसायन वापरले जाते. आम्ही मात्र अशा पेशी human platelet lysate मध्ये वाढविण्यात यशस्वी झालो. रक्तपेढीतील प्लेटलेट रक्त काढल्यापासून चार दिवसांनंतर रुग्णांना देण्यासाठी वापरले जात नाही. आम्ही ते प्लेटलेट या पेशींच्या संवर्धनासाठी वापरतो. याचा आणखी एक फायदा असा की यामुळे संसर्गदोषाचा (zoonotic infections) धोका नाही आणि शिवाय हे द्रव्य महागड्या आयात द्रव्याला शेकडो पटीने स्वस्त आणि उत्तम देशी पर्याय आहे!

डेरवण येथील Good Manufacturing Practices (GMP) facility मुळे आम्ही येथे आंतरराष्ट्रीय मानकांप्रमाणे आणि नियमांप्रमाणे रुग्णांवर वैद्यकीय चाचण्या (clinical trials) घेऊ शकू. हे सर्व उभे करताना आम्ही काही नवी तंत्रे येथे विकसित केली आहेत आणि त्याचा अन्य क्षेत्रात सुरू असलेल्या 'उती संवर्धन'च्या (tissue culture) कामातही चांगला उपयोग होईल. खरे तर रुग्णसेवा अधिक प्रभावी आणि परवडणारी व्हावी यासाठी हे तंत्रज्ञान अन्य क्षेत्रातही वापरण्याचे आमचे मनसुबे आहेत! धन्यवाद!''

डॉ. नाडकर्णी यांच्या भाषणानंतर डॉ. ऋता मुल्हेरकर यांनी कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या आणि उद्घाटक डॉ. रेणू स्वरूप यांचा



डॉ. ऋता मुल्हेरकर

परिचय करून दिला. डॉ. रेणू स्वरूप या अनुवंश शास्त्रज्ञ (geneticist) असून the Department of Biotechnology (DBT), Ministry of Science and Technology, Government of India, च्या त्या सचिव आहेत. देशाचे जैवतंत्रज्ञानविषयक धोरण ठरविण्यात त्यांचा महत्त्वाचा सहभाग आहे. देशातील सर्वात मोठे सूक्ष्मजीव केंद्र "Microbial Culture Collection" उभारण्याचे श्रेय त्यांना दिले जाते. त्यांनी सूक्ष्मजीव क्षेत्रात केलेल्या संशोधनासाठी आणि "Biological diversity Act, 2002" मधील तरतुदींचे सुलभीकरण करण्यासाठी त्यांनी केलेल्या कामगिरीचा गौरव करण्यासाठी नव्याने संशोधित केलेल्या एका सूक्ष्मजीव प्रजातीला त्यांचे नाव देऊन त्यांचा 'नॅशनल सेंटर फॉर सेल सायन्स'कडून गौरव करण्यात आला आहे. Biotechnology Industry Research Assistance Council (BIRAC) या भारत सरकारच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमाच्या त्या अध्यक्ष आहेत. हा उपक्रम जैवतंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील संशोधनाला आणि नव्या उपक्रमांना, विशेषत: 'स्टार्ट-अप्स'ना उत्तेजन आणि चालना देण्याचे काम करतो. त्यांनी बायोटेक्नॉलॉजी विभागात ३० वर्षांपेक्षा जास्त काळ काम केलेले आहे.

Bioresource development and utilization, Spatial characterisation of biodiversity, Second generation bioethanol and drugs from microbes, The National Biopharma Mission अशा अनेक कार्यक्रमांची धुरा त्यांनी सांभाळलेली आहे. The Biotechnology Vision in 2001, National Biotechnology Development Strategy, 2007, Strategy II, 2015–20 आदींचे स्वरूप ठरविण्याच्या कामात तज्ज्ञांच्या समितीच्या सचिव म्हणून त्यांचा महत्त्वाचा सहभाग होता. महिलांचा बायोटेक्नॉलॉजीच्या क्षेत्रात सहभाग वाढावा यासाठी त्या प्रयत्नशील आहेत. त्यांनी Biotechnology Career Advancement for Women Scientists ही योजना आपल्या विभागातर्फे सुरू केली. पंतप्रधानांच्या शास्त्रीय सल्लागार समितीच्या 'वैज्ञानिक क्षेत्रातील स्त्रिया' या कार्यदलातही त्या कार्यरत होत्या. 'प्रगतीशील देशातील वैज्ञानिक क्षेत्रातील स्त्रिया' या संस्थेच्या त्या सदस्य आहेत. कोविड-१९ विरोधी लढ्यात त्यांच्या विभागाने लक्षणीय कामगिरी केलेली आहे.

दूरदृश्यप्रणालीद्वारा 'थेरपिटिक सेल कल्चर' सुविधेचे उद्घाटन करून डॉ. रेणू स्वरूप आपल्या संदेशात म्हणाल्या, ''या महत्त्वाच्या सुविधेचे उद्घाटन करताना मला अत्यंत आनंद झालेला आहे. हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प उभारणाऱ्या सर्व संबंधितांचे मी अभिनंदन करते. डॉ. मुल्हेरकर, डॉ. नाडकर्णी, श्री. विकासराव वालावलकर या सर्वांचे मी आभारही मानते. कोविड-१९ च्या महामारीमुळे आपल्या आरोग्य व्यवस्थेतील त्रुटी शोधून काढायला आपणाला मदत झाली



*डॉ. रेणू स्वरूप*

आहे. आणि त्याचबरोबर भविष्यात उत्तम दर्जाची, वारंवार सुधारणा केलेली, गरजांनुसार अनुरूप आणि परवडणारी उत्पादने तयार करण्यासाठी विज्ञान, तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकीचा उपयोग होणार आहे. यामुळेच 'आत्मनिर्भर भारत' हे आपले ध्येय साध्य होणार आहे आणि भारत जागतिक दर्जाच्या कसोटीला उतरणार आहे आणि आंतरराष्ट्रीय बाजार पादाक्रांत करू शकणार आहे. लोकांना अनुरूप वैद्यकीय उपचार मिळावेत म्हणून परस्परावलंबी विज्ञान शाखांचा उपयोग करून वेगाने विविध उत्पादने विकसित करण्यात 'समर्थकृपा लाइफ सायन्सेस प्रायव्हेट लिमिटेड'ने लक्षणीय प्रगती केली आहे. आणि त्यासाठी वैद्यकीय संशोधक, अभियंते, शल्यविशारद आणि रुग्णालयाचे कर्मचारी हे या स्टार्ट-अपमध्ये एकजुटीने काम करीत आहेत हे पाहणे अत्यंत आनंददायी आहे. उत्पादन हे संशोधनाच्या टप्प्यापासून व्यापारीकरणाच्या टप्प्यापर्यंत येण्याला होणारा विलंब हा मुख्यत्वे योग्य वैद्यकीय भागिदार शोधणे आणि रुग्णांच्या वैद्यकीय चाचण्या घेणे या गोष्टींमुळे होतो. भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातच ही 'थेरप्युटिक सेल कल्चर' सुविधा सुरू करून 'समर्थ कृपा लाइफ सायन्सेस'ने हे अडथळे दूर केले आहेत आणि व्यापारी तत्त्वावर या पेशींचे उत्पादन करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. संशोधन आणि विकास विभागापासून ते रुग्णपरीक्षा आणि चाचणीपर्यंत साखळीचे सगळेच दुवे येथे एकाच ठिकाणी उपलब्ध असल्याने, त्याचा उत्पादनात द्रुतगतीने वाढ करण्यासाठी उत्तम उपयोग होईल.

SKLS GMP lab ही DBT incubation ecosystem चे एक आदर्श सेवा केंद्र बनेल आणि त्याचा अन्य स्टार्ट-अप्सना त्यांच्या परीक्षणविषयक गरजा भागवण्यासाठी उपयोग होईल अशी मी आशा करते.''

त्यानंतर एका सादरीकरणातून थेरप्युटिक सेल कल्चर फॅसिलिटीचे काम कसे चालते याविषयी माहिती देण्यात आली. 'जी.एम.

पी. कम्प्लायंट थेरप्युटिक सेल कल्चर फॅसिलिटी', ही फॅसिलिटी 'क्लिनिकल ग्रेड इन्टरव्हर्टेब्रल डिस्क सेल' निर्माण करण्यासाठी उभारलेली आहे. पेशी (cells) रुग्णाच्या उतीमधून (tissues) काढून त्यांच्यावर प्रक्रिया करून पुन्हा त्या रुग्णासाठीच वापरले जातील. यासाठी 'जी.एम.पी.' म्हणजे 'गुड मॅन्युफॅक्चरिंग प्रॅक्टिसेस' चे काही निकष आणि पद्धतींचे पालन करणे आवश्यक असते. ही सुविधा उभारताना याची पूर्ण काळजी घेण्यात आली आहे. या 'जी.एम.पी. फॅसिलिटी'मध्ये फक्त ठरावीक अधिकृत व्यक्तींनाच प्रवेश मिळतो.

डेरवणला एन्डोस्कोपिक डिसेक्टमी बरेच दिवस होत आहे. या अनोख्या पद्धतीचे वैशिष्ट्य म्हणजे येथे ती लोकल अॅनेस्थिशिया देऊन एक लहानसे छिद्र पाडून शस्त्रक्रिया केली जाते. त्यासाठी एकही टाका नंतर घ्यावा लागत नाही. म्हणून पेशंटला अधिक वेगाने बरे वाटावे म्हणून गेली काही वर्षे या शस्त्रक्रियेमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी प्रयत्न होत आहेत. येथे 'डेरवण प्लग' पाच-सहा वर्षांपूर्वी उपयोगात आणला जात आहे. आता तो दुसरे अनेक सर्जन्सही वापरतात. आणखी संशोधन केल्यावर येथे डिस्क फ्रॅग्मेंटपासून रिजनरेटिव्ह सेल्स तयार करण्यातही यश आले आहे.

जेव्हा डिसेक्टमी करतो तेव्हा आम्ही स्पेसिमेन एका नळीमध्ये गोळा करतो, ती नळी शीत पेटीत ठेवतो. सोबत पेशंटची माहिती ठेवून ती पेटी टिश्शू कल्चर लॅबमध्ये पाठवितो. 'जी.एम.पी. फॅसिलिटी'मध्ये प्रवेश करण्याचा मार्ग हा ऑपरेशन थिएटरच्या भागातूनच आहे. तेथे टिश्शूज, ब्लड-सॅम्पल असे बायॉलॉजिकल मटेरिअल पहिल्या डायनॅमिक पास बॉक्समध्ये ठेवले जाते. पहिल्या डायनॅमिक पास बॉक्समध्ये ठेवलेले साहित्य चेंजरूम वनमधून निर्जंतूक कपडे घालून आलेला 'प्रिपरेशन रूम' मधील कर्मचारी काढून घेतो. त्याची प्रिपरेशन रूममधील संगणकावर नोंद केली जाते. आणि ते साहित्य दुसऱ्या डायनॅमिक पास बॉक्समध्ये ठेवले जाते. तेथून ते प्रोसेसरूममधील कर्मचारी काढून घेतो. तेथे त्याच्यावर विविध प्रक्रिया होतात आणि त्याच्या प्रगतीवर लक्ष दिले जाते. पेशींची वाढ पूर्ण झाल्यावर त्या पुन्हा उलट मार्गाने ऑपरेशन थिएटरमध्ये आणल्या जातात. काही विपरीत परिणाम होऊ नये म्हणून या प्रक्रियेबाबतचे निकष अगदी काटेकोरपणे ठरवलेले आहेत. डेरवणसारख्या ग्रामीण भागात अशी फॅसिलिटी उभारलेली आहे आणि यातून आम्ही ग्रामीण भागातील लोकांना कमी खर्चात आणि परिणामकारक सेवा देऊ शकू असा आम्हाला विश्वास वाटतो.''

या सादरीकरणानंतर डॉ. ऋता मुल्हेरकर यांनी या समारंभाचे मुख्य पाहुणे डॉ. अनिल काकोडकर यांचा परिचय करून दिला. त्या म्हणाल्या की एवढ्या मोजक्या वेळात डॉक्टर काकोडकरांचा परिचय करून देणे अत्यंत अवघड काम आहे. पद्मविभूषण डॉ. काकोडकर भाभा अणू संशोधन केंद्राचे माजी संचालक आणि अणुशक्ती मंडळाचे चेअरमन होते तसेच भारत सरकारच्या अणुशक्ती खात्याचे सचिव होते. सध्या ते राजीव गांधी कमिशन फॉर सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजीचे चेअरमन आहेत. आपल्या संपूर्ण कारकिर्दीत त्यांनी भारतातील अणुशक्ती कार्यक्रमाच्या प्रगतीसाठी प्रयत्न केले. 'सिलेज'(Cillage) या त्यांच्या महत्त्वाच्या नव्या संकल्पनेनुसार शहरे(City) आणि खेडी(village) यातील दरी कमी करण्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने एक ज्ञानाधिष्ठित इको सिस्टिम निर्माण करून ग्रामीण भागात टिकाऊ सुधारणा करावयाची आहे. आमच्या शास्त्रीय सल्लागार समितीचे नेतृत्त्व ते करतात ही आमच्यासाठी फार महत्त्वाची गोष्ट आहे.

दूरदृश्य प्रणालीद्वारा डॉ. काकोडकर आपल्या संदेशात म्हणाले, ''या महत्त्वाच्या प्रसंगी आपणा सर्वांबरोबर असणे हे फार आनंददायी आहे. डॉ. सुनील नाडकर्णी, डिरेक्टर समर्थकृपा लाइफ सायन्सेस, या उपक्रमाच्या दुसऱ्या डिरेक्टर डॉ. ऋता मुल्हेरकर आणि श्री. विकास वालावलकर, जे सावर्डे परिसरातील या ट्रान्सफॉर्मेशनच्या मागचे आधारस्तंभ आहेत! डॉ. पद्मनाभन, डॉ. बाणावली, डॉ. सुरेन्द्र घासकडवी यांना आणि अन्य उपस्थितांना पाहूनही मला आनंद होत आहे. माझ्या सर्वांना शुभेच्छा! डॉ. रेणू स्वरूप यांनी आपल्या कार्यबाहुल्यातूनही सवड काढून या प्रकल्पाचे उद्‌घाटन करण्याचे सौजन्य दाखविले त्याबद्दल त्यांना धन्यवाद!

मी या संस्थेचा चाहता आहे. या परिसरातील वालावलकर हॉस्पिटल, मेडिकल कॉलेज, कम्युनिटी आउट-रीच, शाळा, शेती अशी अनेक कामे सुरू आहेत. माझी सिलेजबद्दलची तळमळ माहीत असल्यामुळे डॉ. सुवर्णा पाटील यांनी मला येथील हे सर्व कार्य सुरू होण्यापूर्वीची स्थिती सांगितली आहे. त्या कार्याविषयी विकासराव आत्ता बोललेच. चिपळूण हे मोठे शहर आहे आणि सावर्डे जवळचे लहान गाव. पण आज सावर्ड्याची आर्थिक प्रगती चिपळूणपेक्षा वेगाने होत आहे. सर्वसाधारणपणे खेड्यातून लोक शहराकडे राहायला जातात. पण आता चिपळूणचे लोक येथे रिअल इस्टेटमधे गुंतवणूक करीत आहेत. माझ्या सिलेजविषयक कल्पनेचे यापेक्षा उत्तम उदाहरण कोठे मिळेल?

तेथे जे कार्यक्रम सुरू आहेत त्याची उजळणी करण्याची ही वेळ नव्हे. पण तरीही कुपोषण निर्मुलन आणि असांसर्गिक रोगांसंदर्भात ग्रामीण भागातील स्त्रियांसाठी त्यांच्या बालपणापासून ते प्रौढपणापर्यंत ज्या अनेक योजना आहेत त्याचा उल्लेख मला आवर्जून करावासा वाटतो. या संस्थेने स्वत:च्या खर्चाने, दीर्घकाळ ग्रामीण भागात एक महामारीविषयी अभ्यास केला आहे, हे वाखाणण्याजोगे काम आहे. हे काम पंचवीस-तीस वर्षे सातत्याने करावे लागते. त्यामुळे वित्तसाहाय्य करणाऱ्या संस्था अशा कामाला मदत करायला फारशा उत्सुक नसतात.



*पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर*

पुन्हा सांगायचे तर मी या वालावलकर संस्थेचा आणि श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटेबल ट्रस्टचा मोठा प्रशंसक आहे. कारण हे सर्व ते स्वत:च्या सामर्थ्यावर करतात. टाटा मेमोरिअल हॉस्पिटलने या भागात कर्करोगाविषयी अनेक सर्वेक्षणे केली त्या वेळी या संस्थेशी माझा संबंध आला. त्या वेळी साधारणपणे २००० साली सर्वेक्षणाला सह्याद्रीच्या रांगातील दुर्गम खेड्यात जेव्हा हे लोक जात असत तेव्हा ते लोक म्हणायचे की आज पहिल्यानेच कोणीतरी आमच्या गावात संपर्क साधला. तेव्हा स्वातंत्र्य मिळून ५० वर्षे होऊन गेली होती! हे या ट्रस्टच्या कामाचे महत्त्व आहे!

डॉ. सुनील नाडकर्णींनी या फॅसिलिटीविषयी विस्ताराने सांगितले. या कामाच्या प्रगतीविषयी माहिती शास्त्रीय सल्लागार समितीच्या सभेत मिळतच होती. डॉ. मुल्हेरकर, डॉ. नाडकर्णी आणि त्यांचे सहकारी यांची एकत्र काम करण्याची क्षमता वाखाणण्यासारखी आहे. एवढी कठीण कामगिरी अशा लहानशा ठिकाणी करणे हे आव्हानात्मक होते. पण त्यांनी आव्हानांवर मात केली आहे. नव्याने सुरू झालेली GMP-credited therapeutic cell culture lab ही डेरवण येथील अनेक अत्याधुनिक सुविधांमध्ये पडलेली भर आहे. मुंबई-पुण्याचे अनेक समर्पित आणि उत्साही तज्ज्ञ डेरवणला लोकांना दर्जेदार आणि परवडणारी वैद्यकीय सेवा त्यांच्या विभागात देण्यासाठी येतात. त्याचा फायदा जे गरीब लोक मोठ्या शहरात जाऊ शकत नाहीत त्यांना होतो. भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाने घालून दिलेले हे उदाहरण देशभरात सर्वत्र अनुकरणीय ठरावे असे आहे. डॉ. बाणवली एकदा मला म्हणाले होते की शहरापेक्षा ग्रामीण भागात रुग्णांना ट्रिटमेंट देताना वेगळ्या पद्धती विकसित कराव्या लागतात. त्याचा अर्थातच या गरीब देशात गरिबांना वैद्यकीय सेवा देताना उपयोगच होतो. त्यामुळे नवीन संशोधनाला चालना मिळते आणि आरोग्यविषयक समस्यांना तोंड देता येते. ग्रामीण भागात असे संशोधन होणे म्हणजे ते संशोधन कमी प्रतीचे आहे असे होत नाही. आपल्या देशात अशी मोजकी उदाहरणे आहेत जेथे अत्याधुनिक संशोधन सुरू आहे. आणि त्याला वाढीसाठी चालना मिळाली पाहिजे. वैद्यकीय कारणासाठी मोठ्या संख्येने आलेल्या परदेशी प्रवाशांना तुलनेने परवडणारी वैद्यकीय सेवा देण्याबाबत भारताची ख्याती आहे पण आर्थिकदृष्ट्या कठीण परिस्थितीतील आपल्याच देशबांधवांच्या गरजा आपण भागवू शकलो नाही तर अशा बढाया मारण्यात काय अर्थ आहे? त्यासंदर्भात येथील हॉस्पिटल, कॉलेज, शाळा, क्रीडासंकुल, पोषणादी आउट-रिच प्रोग्रॅम, शेती आदीचा हा जो एकात्मिक प्रयोग आहे तो महत्त्वाचा आहे. त्याचा आपल्या विकासाच्या आराखड्यात समावेश झाला पाहिजे. त्यासाठी अधिक धन लागत नाही. उलट समर्पित माणसे असतील तर तो कमी खर्चाचाच ठरतो. आणि अशी समर्पित माणसे येथे खूप आहेत.''

ट्रस्ट, सर्व संस्था, सेल कल्चर फॅसिलिटी, समर्थकृपाचे सर्व संचालक अणि सर्वांना भरपूर शुभेच्छा देऊन श्री. काकोडकर यांनी आपला संदेश समाप्त केला. यानंतर डॉ. मुल्हेरकर यांनी आभारप्रदर्शन केल्यावर हा समारंभ समाप्त झाला.



*प्रिपरेशन रूम*



*प्रोसेस रूम*

# ड्रग रेझिस्टन्ट (डी.आर.) टी. बी. केंद्राचा उद्‌घाटन सोहळा




**'सर्वे भवन्तु सुखिनः । सर्वे सन्तु निरामयाः।**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु । मा कश्चिद्‌दुःखभाग्भवेत् ।'**

या संस्कृत प्रार्थनेप्रमाणे वर्षानुवर्षे कोकणातील अतिदुर्गम भागातील लोकांचे आरोग्य जपण्याचे शिवधनुष्य यशस्वीपणे, सक्षम खांद्यांवर पेलणाऱ्या श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा 'डी. आर. टी. बी.' केंद्राच्या रूपाने रोवला गेला आहे. क्षयरोगाचे सन २०२५पर्यंत समूळ उच्चाटन करण्याचे राष्ट्रीय ध्येय पूर्ण करण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल असलेल्या ड्रग रेझिस्टन्स ( डी.आर.) टी. बी. केंद्राचा उद्‌घाटन आणि लोकार्पण सोहळा मा. डॉ. इंदुमती जाखड (मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. रत्नागिरी ) यांच्या शुभहस्ते तसेच डॉ. अनिरुद्ध आठल्ये (जिल्हा आरोग्य अधिकारी, रत्नागिरी), डॉ. महेंद्र गावडे (जिल्हा क्षयरोग निर्मूलन अधिकारी, रत्नागिरी), डॉ. यादव मॅडम (तालुका वैद्यकीय अधिकारी, चिपळूण) व डॉ. रघुनाथ भोई (वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय, कामथे) यांच्या प्रमुख उपस्थितीत डेरवण रुग्णालयात उत्साहात पार पडला.

सर्वप्रथम या उद्‌घाटन सोहळ्यास उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत माननीय वैद्यकीय संचालिक, डॉ. सुवर्णा पाटील तसेच डॉ. नेताजी पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन केले. या उद्‌घाटन सोहळ्यासाठी रुग्णालयातून डी.आर.टी.बी. केंद्राकडे जात असताना रुग्णालयांतील विविध अद्ययावत सोईसुविधांची महिती त्यांनी प्रमुख पाहुण्या डॉ. इंदुमती जाखड तसेच उपस्थित सर्व मान्यवरांना दिली.

खाजगी व सरकारी भागिदारीच्या शासन धोरणावर आधारित हे कोकणातील पहिले डी.आर.टी.बी. केंद्र असून, हे सुरू करण्यासाठी माजी जिल्हा क्षयरोग निर्मूलन अधिकार डॉ. श्रीकांत देसाई यांनी मोलाची भूमिका पार पाडली होती त्याची आवर्जून आठवण मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी काढली. तसेच सध्याचे मुख्य क्षयरोग निर्मूलन अधिकारी डॉ. महेंद्र गावडे हेही या केंद्राची यशस्वी वाटचाल करण्यासाठी तितकेच सक्षम व कर्तव्यदक्ष आहेत असे मतप्रदर्शन त्यानी केले.

प्रमुख पाहुण्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. इंदुमती जाखड तसेच उपस्थित सर्व मान्यवरांनी रुग्णालय परिसरातील ऑक्सिजन निर्मिती प्रकल्प, जलशुद्धीकरण प्रकल्प, तसेच वैद्यकीय महाविद्यालयातील विविध विभागास भेट दिली. रुग्णालयातील विविध रुग्णकल्याणकारी योजना व सोईसुविधा पाहून प्रभावित झालेल्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, यापुढेही भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर



*मा. डॉ. इंदुमती जाखड यांच्या हस्ते डी.आर.टी.बी. केंद्राचे उद्‌घाटन*



मा. डॉ. इंदुमती जाखड यांनी रुग्णालयातील विविध विभागांची पाहणी केली

वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, डेरवण व मुख्य आरोग्य विभाग संयुक्तपणे जिल्ह्यातील दुर्गम भागात विविध रुग्णकल्याणकारी योजना राबवून जिल्ह्याच्या आरोग्य व्यवस्थेस बळकटी देतील अशी आशा व्यक्त केली.

यासाठी मा. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुद्ध आठल्ये यांनी संपूर्ण सहकार्य करण्याची ग्वाही दिली, तसेच जिल्हा क्षयरोग निर्मूलन अधिकार डॉ. महेंद्र गावडे यांनी जिल्हा क्षयरोग सोसायटी व जिल्हा क्षयरोग निर्मूलन कक्षामार्फत नव्याने स्थापित झालेल्या डी. आर.टी.बी. केंद्रास राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलनाच्या मार्गदर्शक तत्त्वांना अधीन राहून सर्व ती मदत तसेच मार्गदर्शन करण्याचे आश्वासन दिले व डेरवण येथे नव्याने स्थापित झालेले हे डी.आर.टी.बी. केंद्र कोरोनाकाळात जिल्ह्यातील ड्रग रेजिस्टन्ट टीबीच्या रुग्णांसाठी एक वरदान ठरेल असे ते म्हणाले. डॉ. अमेय परांजपे, डॉ. प्रसन्न नकाते आणि डॉ. योगेन्द्र शेळके यांच्या अथक प्रयत्नांनी हे केंद्र सुरू होत आहे.

या उद्घाटन सोहळ्यात जिल्हा क्षयरोग निर्मूलन कक्षाचे श्री. श्रीकांत सामंत, श्री. निलेश सुर्वे, कामथे उपजिल्हा रुग्णालयातील क्षयरोग निर्मूलन विभागाचे कर्मचारी श्री. अभिजित बोबेकर, श्री. कोळी, कु. सुतार मॅडम इत्यादी आवर्जून उपस्थित होते.



मा. डॉ. इंदुमती जाखड, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. रत्नागिरी यांनी प्राणवायू निर्मिती संयंत्राची माहिती घेतली.

## डॉ. माधुरी कानिटकर (व्हाईस चान्सलर ) महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्सेस, नाशिक यांना सदिच्छा भेट



*श्री. विकासराव वालावलकर, डॉ. सुवर्णा पाटील, मा. डॉ. माधुरी कानिटकर, प्रा. नेहा देशपांडे आणि प्रफुल्ल गोडबोले*

दि. १४ डिसेंबर २०२१ रोजी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू, लेफ्टनंट कर्नल डॉ. माधुरी कानिटकर यांची नाशिक येथे श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टचे प्रमुख विश्वस्त श्री. विकास वालावलकर, डॉ. सुवर्णा पाटील, श्री. प्रफुल्ल गोडबोले आणि प्रा. नेहा देशपांडे यांनी सदिच्छा भेट घेतली. डॉ. सुवर्णा पाटील यांनी श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टतर्फे डेरवण येथे सुरू असलेल्या विविध कामाचे व संशोधनाचे सादरीकरण केले. भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय आणि भ.क.ल. वालावलकर रुग्णालय आणि संशोधन केंद्र या सहशिक्षण आणि संशोधन क्षेत्रात सुरू असलेल्या विविध प्रकल्पांविषयी या वेळी मा. कुलगुरूंनी आस्थेने माहिती करून घेतली.

डॉ. कानिटकर यांनी विद्यापीठही यापुढे संशोधनावर अधिक भर देणार असून अनेक नवनवीन विषय व संशोधन हाती घेणार आहे आहे असे प्रतिपादन करून सर्वांना प्रोत्साहित केले.

## डॉ. विनिता शर्मा, माजी संचालक, SEED, DST, Delhi यांची सदिच्छा आणि मार्गदर्शनपर भेट.




*(डावीकडून सहाव्या) डॉ. विनिता शर्मा, माजी संचालक, SEED, DST, Delhi यांच्यासोबत डॉ. सुवर्णा पाटील आणि सहकारी*

# प्राणवायू निर्मिती संयंत्र – स्वयंपूर्णतेकडे वाटचाल

रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात नेहमीच मोठ्या प्रमाणावर प्राणवायूची गरज असते. आजपर्यंत तो पुणे, कोल्हापूर, कराड येथून सिलिंडर्समधून आणला जात असे. पुरवठ्यातील अनियमिततेमुळे काही वेळा फार अडचणीची परिस्थिती निर्माण होत असे. कोविड-१९ च्या काळात काही जिल्हा स्तरावरील सरकारी यंत्रणांनी त्यांच्या जिल्ह्याबाहेर पुरवठा करण्यावर काही निर्बंध घातले होते. नेमकी त्याच वेळेला रुग्णालयात रोजच्या वापरासाठी प्राणवायूची मोठ्या प्रमाणात गरज होती. त्यामुळेच रुग्णालयाच्या आजच्या आणि निकट भविष्यातील गरजा लक्षात घेऊन दोन प्राणवायू संयंत्रे उभारण्यात आली आहेत.

## द्रवरूप प्राणवायू साठवणूक यंत्रणा

या यंत्रणेमध्ये प्राणवायू साठवण्याची टाकी, बाष्पीभवन यंत्रणा आणि वायूदाब नियंत्रक तसेच राखीव प्राणवायू पुरवठा यंत्रणा इत्यादींचा समावेश आहे. मोठ्या प्रमाणावरील द्रवरूप प्राणवायू उणे १८० अंश सेल्सियस एवढ्या कमी तापमानाला साठवला जातो. नंतर सभोवतालच्या वातावरणातील उष्णतेचा उपयोग करून द्रवरूप प्राणवायूचे रूपांतर वायूरूपातील प्राणवायूमध्ये करण्यात येते. समान वस्तूमानाच्या उच्च दाबाखालील वायूरूपातील प्राणवायूपेक्षा द्रवरूपातील प्राणवायू कमी जागेत साठवला जाऊ शकतो व किफायतशीरही होतो. कमी तापमानातील द्रवरूप प्राणवायू ९९.५ टक्के किंवा त्याहूनही अधिक शुद्ध स्वरूपात असतो. या प्रकल्पाची साठवण क्षमता १३००० लिटर एवढी आहे आणि ती आपल्या गरजेपेक्षा अधिक आहे. जेव्हा या टाकीतील क्षमतेच्या निम्मा साठा वापरला जातो तेव्हा उत्पादकांना त्याची जीपीएस यंत्रणेद्वारा माहिती पोहोचते आणि एक दोन दिवसातच ते टाकी पुन्हा भरण्याची व्यवस्था करतात.

## प्रेशर स्विंग ॲड्सॉर्पशन यंत्रणा

काही आकस्मिक अडचणी आल्यास पर्यायी व्यवस्था म्हणून आधुनिक प्रेशर स्विंग ॲड्सॉर्पशन **(PSA)** तंत्रज्ञान वापरून पीएसए प्राणवायू निर्मिती प्रकल्प उभारण्यात आलेला आहे. हा प्लॅन्ट जिओलाइट अण्विक चाळणी वापरून हवेतील प्राणवायू वेगळा करतो. या प्रकल्पाच्या माध्यमातून निर्मिती करण्यात आलेल्या प्राणवायूची शुद्धता भारतीय तसेच अमेरिकी औषध निर्मितीबाबतच्या मानकांची पूर्तता करण्याएवढी / करणारी म्हणजेच जवळजवळ ९५ टक्के आहे. सदर ऑक्सिएअर ऑक्सिजन जनरेशन प्लांट, मॉडेल क्रमांक ओ ए २०० याची क्षमता ९५ लिटर प्रति मिनीट किंवा २० जम्बो सिलिंडर प्रतिदिन एवढी आहे.




*द्रवरूप प्राणवायू साठवणूक यंत्रणा*




*पीएसए प्राणवायू निर्मिती यंत्रणा*

# डेरवण शाळेचा माजी विद्यार्थी प्रथमेशचे UPSC परीक्षेत उल्लेखनीय यश



*श्री. प्रथमेश राजेशिर्के यांचा सत्कार करताना शिक्षण संचालिका शरयू यशवंतराव*

'शिक्षण क्षेत्रात केलेली गुंतवणुक ही राष्ट्रासाठी सगळ्यात महत्त्वाची गुंतवणूक आहे' या एकमेव विचाराने प्रेरित होऊन चालविल्या जाणाऱ्या श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित इंग्रजी माध्यम शाळेचा माजी विद्यार्थी कु. प्रथमेश अरविंद राजेशिर्के याने UPSC 2020 परीक्षेत उत्तीर्ण होऊन राष्ट्रीय पातळीवर २३६ गुणानुक्रम पटकावून उज्ज्वल यश संपादित केले. एका खेडेगावातील सामान्य परिस्थितीतील मुलाने हे राष्ट्रीय यश प्राप्त केल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

डेरवणच्या इंग्रजी माध्यम शाळेत प्रथमेशने मार्च २०११ साली ९५ टक्के गुण मिळवून SSC परीक्षा उत्तीर्ण केली. त्यानंतर शासकीय तंत्रनिकेतन रत्नागिरी येथे डिप्लोमा इन मेकॅनिकल इंजिनीअरींग ही पदविका प्राप्त करून वालचंद कॉलेज ऑफ इंजिनीअरींग, सांगली येथे बी. टेक. (मेकॅनिकल) पदवी प्राप्त केली. त्यानंतर पुण्याला एक वर्ष नोकरी करून कुटुंबाला आर्थिक हातभार लावला व त्यानंतर दिल्लीला जाऊन २ वर्षे स्वत:ला UPSC परीक्षेच्या तयारीला वाहून घेतले. पहिल्यापासूनच अभ्यासूवृत्ती, परिश्रमाची कास, चिकाटी, नम्रता या गुणांमुळेच प्रथमेशचे प्रयत्न सफल झाले. प्रथमेशचे यश साजरे करण्यासाठी व विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी शाळेच्यावतीने त्याचा कौतुकसमारंभ आयोजित करण्यात आला. दीपप्रज्वलन व शिक्षिका सुखदा काजरेकर यांच्या सुरेल स्वागतगीताने कार्यक्रमाची मंगलमय सुरूवात झाली. श्रीफळ, पुष्पगुच्छ व शाळेचे स्मृतिचिन्ह देऊन प्रथमेशचा सत्कार करण्यात आला.

मुख्याध्यापिका प्रज्ञा पारकर यांनी प्रथमेशच्या विद्यार्थीदशेतील आठवणी सांगितल्या. बोलका, सतत प्रश्न विचारणारा, विविध स्पर्धेत भाग घेण्यात अग्रेसर असा हा विद्यार्थी शिक्षकांच्या कायम लक्षात राहील असाच होता. शाळेमध्ये 'Best Student of the Year' हे पारितोषिक सुरू केल्यानंतर त्याचा पहिला मानकरी प्रथमेश होता याची त्यांनी आठवण करून दिली. शाळा संचालिका शरयू यशवंतराव यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शाळा स्थापनेचा उद्देशच येथील ग्रामीण भागातील मुलांना राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर स्पर्धा करण्याचे बळ मिळावे व त्यात त्यांना इंग्रजी भाषेचा अडसर येऊ नये हा आहे असे स्पष्ट केले आणि प्रथमेशने शाळेच्या इतिहासात पहिला UPSC अधिकारी म्हणून आपले नाव कोरून हा उद्देश सफल केला आहे असे सांगितले. ''या शाळेचे अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रांत आपला ठसा उमटवत आहेत आणि प्रथमेशने लोकसेवा आयोगाच्या क्षेत्रात भरीव यश संपादन केल्याने शाळेला त्याचा सार्थ अभिमान आहे!'' असे त्या म्हणाल्या.

सत्काराला उत्तर देताना प्रथमेश म्हणाला, ''आपल्याच शाळेमध्ये सत्कारमूर्ती म्हणून मान मिळाला हे माझे अहोभाग्य आहे. आज माझे एक स्वप्न पूर्ण झाले. मी खरंच नशीबवान आहे की मी या भूमीत जन्मलो आणि डेरवणच्या शाळेत शिकलो. या शाळेने, येथील शिक्षकांनी मला घडवले - मी त्यांचा ऋणी आहे.''

शाळेतील आठवणी सांगताना तो म्हणाला, जेव्हा मी शाळेत होतो तेव्हा या ऑडिटोरियम मध्येच गॅदरिंग व्हायचे. खाली बॅडमिंटन



*श्री. प्रथमेश राजेशिर्के यांचे सत्काराला उत्तर*

कोर्टचे मार्कींग होते. वरती बाल्कनी नव्हती. बक्षीस घेणारे इथे रांग लावायचे. नाटकासाठी लागणाऱ्या पुठ्ठ्याच्या तलवारी, कापसाच्या दाढी-मिशा वगैरे आम्ही दोन महिने आधीपासूनच बनवायचो. एकदा मी अलेक्झान्डर झालो होतो. बहिणीचा पंजाबी ड्रेसचा टॉप, त्यावर वडिलांचा बेल्ट आणि पायात गमबूट असा वेश केला होता. काय जुगाड करायचो आम्ही! ही आठवण तुम्हाला सांगण्याचा उद्देश एवढाच की तुम्ही जे अनुभव घेत आहात तेच अनुभव मीही घेतले आहेत. मी तुमच्यापेक्षा वेगळा नाही. आत्ताच शिक्षकांनी सांगितले की मी अभ्यासू होतो, पण मला शिक्षाही बऱ्याचदा झाली आहे. शिक्षा करावी की नाही हा मुद्दा बाजूला ठेवू पण माझ्यात सुधारणा व्हायला या शिक्षेने मदतच केली आहे.

आमची वर्गामध्ये मार्कांसाठी चुरस असायची. तसेच शाळेत येणाऱ्या पाहुण्यांशी संवाद साधताना आम्ही त्यांच्याशी खूप बोलत असू. मी शाळेतील वक्तृत्व स्पर्धा, वाद-विवाद स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन यात आवडीने भाग घेत होतो. UPSC परीक्षेच्या Mock Interview घेणाऱ्या पॅनलच्या सदस्यांनी मला विचारले की तू एका खेडेगावातून आला आहेस मग तुझे इंग्रजी एवढे चांगले कसे? मी त्यांना उत्तर दिले की माझी कौटुंबिक पार्श्वभूमी मांडकी हे गाव असले तरी मी डेरवणच्या इंग्रजी शाळेत शिकलो आहे! मला आठवतं की माझ्या एका Mock Interview वेळी पॅनलमधील एका सदस्याने मला आपल्या शाळेबद्दल विचारले आणि त्यांनी आपल्या संस्थेला भेट दिली असल्याचे सांगितले. यावरून हे लक्षात घेतले पाहिजे की आपल्या शाळेचे नाव खूप मोठे आहे आणि ते सतत उंचावत ठेवणे ही आपली जबाबदारी आहे!

आम्ही शाळेत होतो तेव्हा क्रीडा स्पर्धांमध्ये आपली मुले मागे असत म्हणून मनाला खंत वाटे. पण आता Sports Complex बघितले आणि आपले विद्यार्थी क्रीडा स्पर्धांमध्ये उज्ज्वल यश संपादन करत आहेत हे ऐकून गर्व वाटतो. आमचे स्वप्न पूर्ण झाल्याचा आनंद होतो.

यानंतर UPSC या राष्ट्रीय स्तराच्या परीक्षेचे स्वरूप, त्याद्वारे भरली जाणारी पदे, त्यांच्या जबाबदाऱ्या, लोकसेवेची संधी याची विस्तृत माहिती प्रथमेशने आपल्या विद्यार्थी मित्रांना दिली. तसेच या परीक्षेची काठिण्य पातळी, लाखाने मुले परीक्षेला बसतात त्यात केवळ ७५० निवडली जातात त्यामुळे असणारी स्पर्धा, उत्तीर्ण होण्यासाठी करावा लागणारा अभ्यास, स्वयंअध्ययन, चिकाटी याबाबतही विद्यार्थ्यांना अवगत केले.

आपल्या भाषणाच्या शेवटी प्रथमेशने विद्यार्थ्यांना मौलिक संदेश दिला. तो म्हणाला, ''उपदेश करायला मी कुणी मोठा नाही. पण तुमचा एक वडीलभाऊ या नात्याने आणि काही अनुभव गाठीशी आहे म्हणून तुम्हाला चार संदेश देत आहे. पहिला - प्रामाणिक रहा! तुम्ही अभ्यास, खेळ, छंद जोपासणे - जे काही करत असाल ते प्रामाणिकपणे करा, जीव ओतून करा. कधी खोटं बोलू नका. दुसरा - आपल्या मित्रमैत्रिणींना चिडवू नका. चिडवलेलं मनाला लागतं. या जखमा कधीच भरत नाहीत. चिडवायचंच असेल तर चांगल्या गुणांसाठी त्यांना जरूर नावे ठेवा. जसे एखादा अभ्यासात हुशार असेल तर त्याला 'आईन्स्टाईन' म्हणा, पळण्यात कुशल असेल तर 'बोल्ट' म्हणा, चांगला फुटबॉलपटू असेल तर 'मेस्सी' म्हणा. तिसरा - सतत स्वत:चीच एक उत्तम आवृत्ती निर्माण करा. कालच्यापेक्षा आज तुम्ही अधिक दर्जेदार असाल याची दक्षता घ्या. दररोज नवनवीन उत्तम गुण आत्मसात करा जेणेकरून या छोट्या छोट्या कणांनी तुमचे व्यक्तिमत्त्व विकसित होईल. आणि शेवटचा चौथा संदेश म्हणजे नेहमी नम्र आणि विनयशील रहा. माणुसकी असणे हा चारित्र्याचा अलंकार आहे. दयाळू असणे, इतरांचा आदर करणे, आपल्या उणिवा स्वीकारणे, चुकीबद्दल दिलगिरी व्यक्त करणे हे माझ्या चारित्र्याचे पैलू आहेत. तुमच्या आयुष्यात अनेक यशश्री येतील आणि जातील पण चारित्र्य कायम टिकणार आहे. तेच तुमचं सर्वस्व आहे हे लक्षात असू द्या.''

यानंतर विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देऊन प्रथमेशने त्यांच्या शंकांचे निरसन केले. Mock Interview देताना तुमची मन:स्थिती कशी होती असे एका विद्यार्थ्याने विचारले असता तो म्हणाला की आपण तयार केलेला प्रकल्प आपल्या वरिष्ठांना सादर करणार आहोत हे मनात ठेऊन मी मुलाखतीला सामोरे गेलो. तसेच आपण आध्यात्मिकही असले पाहिजे असे माझे मत आहे. शाळेमध्ये असताना आमच्याकडून भगवत्गीतेतील पुरुषोत्तम योग पाठ करून घेतला होता, तो आजही माझ्या तोंडपाठ आहे आणि त्याच वेळी मला अध्यात्माचे महत्त्व पटले. श्री स्वामी समर्थांना मी गुरुस्थानी मानतो. 'तुमच्या सगळ्या व्यापातून माझ्याकडे थोडे लक्ष असू द्या' अशी मी त्यांना मनोभावे प्रार्थना करतो.'' शेवटी पुनश्च शाळेचे ऋण व्यक्त करून त्याने आपले भाषण संपवले.

आभार प्रदर्शन आणि वंदेमातरम् गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाला शिक्षकवृंद व माध्यमिक विभागातील विद्यार्थी उपस्थित होते. शिक्षिका जान्हवी चाळके यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# वालावलकर क्रॉस–कंट्री स्पर्धा उत्साहात संपन्न



*प्रो–कबड्डी खेळाडू श्री. शुभम शिंदे स्पर्धेचा शुभारंभ करताना*

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या क्रीडासंकुलात भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर क्रॉसकंट्री स्पर्धा दि. २८ सप्टेंबर २०२१ रोजी उत्साही वातावरणात पार पडली. स्पर्धेच्या उद्‌घाटन प्रसंगी 'प्रो–कबड्डी' खेळाडू शुभम शिंदे, ग्रामपंचायत सदस्य अजित कोकाटे, शरद चव्हाण, विजय बागवे, जिल्हा परिषद शिक्षक संघटनेचे अध्यक्ष विकास नलावडे, 'गुणवंत क्रीडा प्रशिक्षक पुरस्कारप्राप्त' हर्षल निकम आदी मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते. त्याचबरोबर संस्थेचे प्रमुख विश्वस्त श्री. अशोक र. जोशी, कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर शिक्षण संचालिका सौ. शरयू यशवंतराव, रत्नागिरी जिल्ह्यातील ज्येष्ठ क्रीडासंघटक संदीप तावडे, सुधाकर जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेच्या ठिकाणी सॅनिटायझर, तापमानाची मोजणी तसेच सुरक्षित अंतर ठेवून सुरक्षिततेची काळजी घेण्यात आली होती.

या स्पर्धेत १२ वर्षांखालील मुलांच्या गटात पृथ्वी राजभर, गणेश चव्हाण, अक्षय वासुदेव, जयकुमार चव्हाण, धैर्यशील पवार; १२ वर्षांखालील मुलींच्या गटात चैताली चव्हाण, चैत्राली वाडेकर, आकाश देवकर, श्रावणी गरुड, हुमेरा सय्यद, तसेच १४ वर्षांखालील मुलांच्या गटात ऋतिक वर्मा, संकल्प परीट, कार्तिक भिसुरे, श्रेयस ओकटे, यश चव्हाण आणि १४ वर्षांखालील मुलींच्या गटात श्रावणी लिबे, लताराज अरुरी, आरोही पालखेडे, आर्या कराते, तनया धुमक



*स्पर्धेत मुलींचा लक्षणीय सहभाग*




*श्री. विजय बागवे विजेत्यांना पारितिषिके देताना*

या खेळाडूंनी यश प्राप्त केले. १६ वर्षांखालील मुलांच्या गटात स्वराज जोशी, दीक्षांत जाधव, पार्थ कान्हेरे, आर्यन मिरजे, सागर चिंदगे, तसेच १८ वर्षांखालील मुलांच्या गटात अनिकेत चांदिवडे, आदित्य पाटील, रोहित नलावडे, मृणाल सरोदे, साहिल आंबेडे, तर १८ वर्षांखालील मुलींच्या गटात साक्षी जड्याळ, वैष्णवी मोरे, भक्ती पाटील, अश्विनी लोखंडे, ऋतुजा गोंगाने या खेळाडूंनी बाजी मारली. प्रत्येक गटात पहिल्या तीन क्रमांक मिळवलेल्या खेळाडूंना पदक, रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच चार व पाच क्रमांक पटकावलेल्या खेळाडूंना रोख रक्कम व प्रमाणपत्र देण्यात आले. या स्पर्धेसाठी जालना, पालघर, ठाणे, गडहिंग्लज, निपाणीसह राज्याच्या विविध भागातून सुमारे सहाशे खेळाडू सहभागी झाले होते.



*श्री. विकास नलावडे यांचा सत्कार करताना श्री. सुधाकर जाधव*




*श्री. विकासराव वालावलकर आणि श्रीकांत पराडकर विजेत्या स्पर्धकांसमवेत*

## खेलो इंडिया कबड्डी स्पर्धा क्रीडासंकुलात संपन्न

एसव्हीजेसीटी क्रीडासंकुलाच्या बंदिस्त मैदानात जिल्हा क्रीडा कार्यालय, रत्नागिरी यांचेमार्फत आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय खेलो इंडिया कबड्डी स्पर्धा दि. २५ नोव्हेंबर २०२१ रोजी जल्लोषात संपन्न झाली. १८ वर्षांखालील मुले आणि मुलींसाठी आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत मुलांच्या २५ तर मुलींच्या आठ संघानी सहभाग नोंदविला होता. रत्नागिरी जिल्ह्यातील अनेक दुर्गम भागातील संघ या स्पर्धेत आवर्जून सहभागी झाले होते. तसेच प्रत्येक संघाला प्रोत्साहन देण्यासाठी आलेल्या प्रेक्षकांमुळे क्रीडासंकुल गजबजून गेले होते. कबड्डी खेळातील रत्नाची खाण असलेल्या रत्नागिरी जिल्ह्याचे नाव उज्वल होण्यासाठी युवा खेळाडू कसून मेहनत घेत असतात. ज्याप्रमाणे रत्नागिरी जिल्ह्याचे अनेक नामवंत खेळाडू आंतराष्ट्रीय सामने गाजवत आहेत त्यांचीच परंपरा पुढे नेण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी किरण बोरवडेकर यांनी करून स्पर्धेचे उद्घाटन केले. याप्रसंगी शारीरिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष उदयराज कळंबे, जिल्हा कबड्डी असोसिएशनचे श्री. विकास पवार, भूषण कुलकर्णी, विलास गुजर, मुन्ना देसाई, सोमनाथ सुरवसे, निहार कोवळे, संतोष शिर्के, रवींद्र वासुरकर आदी मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य असोसिएशनच्या उपाध्यक्ष सौ. नेत्रा राजेशिर्के यांनी खेळाडूंना शुभेच्छा देताना सांगितले की खेळाडूंनी आपल्या जिल्ह्याचे, विभागाचे राज्याचे, देशाचे नाव खेलो इंडिया या स्पर्धेच्या माध्यमातून उज्वल करावे. प्रत्येक खेळाडूने नावलौकिक होण्यासाठी उत्तम खेळ दाखववावा. स्पर्धेमध्ये मुलांमध्ये न्यू हिंदी विजय संघ, चिपळूण विजयी ठरला तर श्रीराम विजय संघ, कर्दे, दापोली हा उपविजेता ठरला. तसेच मुलींच्या संघांमध्ये स्वराज्य संघ, चिपळूण विजयी तर दुर्गामाता संघ, दापोली उपविजेता ठरला. उपांत्यपूर्व फेरीनंतरचे सर्व सामने प्रकाशझोतात खेळविल्यामुळे आंतरराष्ट्रीय सामने चालू असल्याचा भास होत होता. कबड्डी खेळासाठी कायमच सुसज्ज असलेल्या या मैदानाचा वापर, येणाऱ्या संघानी आपल्या सरावासाठी करावा, तसेच वालावलकर रुग्णालयाच्या माध्यमातून मिळणाऱ्या आहारविषयक, आरोग्यविषयक योजनांचा फायदा घ्यावा असे आवाहन क्रीडासंकुलातर्फे करण्यात आले. नव्या खेळाडूंसाठी लवकरच येथे कायमस्वरूपी मॅट्स आणून तंत्रशुद्ध प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात येणार आहे असे संघटनेचे चिटणीस विकास पवार यांनी सांगितले.






*खेलो इंडिया कबड्डी स्पर्धा - क्षणचित्रे*

## ऑल इंडिया फुटबॉल स्पर्धेत मुंबई, नाशिक संघांची बाजी

फुटबॉल असोसिएशन ऑफ रत्नागिरी डिस्ट्रिक्ट आणि शिवरत्न अकॅडमी आयोजित ऑल इंडिया फुटबॉल चॅम्पियनशिप, एसव्हीजेसिटी क्रीडासंकुलात दि. २७ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत संपन्न झाली. १३/१५/१८ वर्षांखालील मुलांसाठी आयोजित केल्या गेलेल्या या स्पर्धेत एकूण १८ संघांनी सहभाग नोंदविला. गोवा येथून ३ तसेच बेळगाव येथील २ आणि बेंगलोर येथील १ असे राज्याबाहेरील संघही या स्पर्धेत सहभागी झाले होते. नागपूर तसेच औरंगाबाद येथील संघही या स्पर्धेत सहभागी होते. प्रत्येक गटात सहा संघ सहभागी असलेल्या या स्पर्धेत प्रत्येक गटात गोव्याचे संघ उपविजेते ठरले. १३ वर्षांखालील वयोगटात चुरशीने खेळल्या गेलेल्या अनेक सामन्यांमध्ये नाशिक येथील संभाजी क्लबने नाशिकच्याच नाशिक युनायटेडचा पराभव करून विजेतेपद पटकावले. पुण्याचा परशुराम क्लब तिसऱ्या स्थानावर राहिला. १५ वर्षांखालील गटात नाशिकच्याच अनबिटेबल संघाने गोव्याच्या सुपर ३० संघाविरुद्ध दमदार खेळ करून अंतिम सामना जिंकला. संपूर्ण स्पर्धेवर असणारी गोव्याच्या संघांची पकड या सामन्यामुळे खिळखिळी झाली. तृतीय क्रमांकावर पुण्याचा स्टेपओव्हर संघ राहिला.

स्पर्धेतील महत्त्वाच्या १८ वर्षांखालील गटात मुंबईच्या ईनव्हीनसिबल क्लबने गोव्याच्या केयूएफसी संघाविरुद्ध रोमहर्षक खेळ करून विजेतेपद पटकाविले. एसव्हीजेसीटीचा संघ या गटात तृतीय क्रमांकावर राहिला.

''येथील क्रीडासंकुलात येऊन स्पर्धा खेळणे हा आमच्यासाठी नवी दिशा देणार अनुभव आहे. ग्रामीण भागात असलेल्या अशा प्रकारच्या कौतुकास्पद क्रीडासुविधा फार अभावानेच पाहायला मिळतात. असल्याच तरी त्यांच्यातून अर्थप्राप्ती हा एकच उद्देश असतो. परंतु येथे खेळाडू, पालक, प्रशिक्षक या सर्वांनाच कोणतीही अडचण न येता सराव करता यावा अशी व्यवस्था असणारे ही एकमेव संकुल आहे!'' असे स्पर्धेसाठी बंगलोर येथून संघ घेऊन आलेले फुवन जोसेफ यांनी सांगितले. ''प्रत्येक वर्षी येथे खेळायला येऊन आम्ही आमची एनर्जी वाढवतो. येथील शिवजयंती

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

स्पर्धेतही आमच्या क्लबची मुले आपला स्वतंत्र संघ बनवून खेळतात. भविष्यात येथे १८ वर्षांखालील खेळाडूंची लीग घ्यावी अशी मी संस्थेला विनंती करतो.'' असे गोवा संघाचे व्यवस्थापक उदय निगूनकर यांनी सांगितले. ''महाराष्ट्रात इतके सुसज्ज मैदान आणि स्वच्छ परिसर खेळाडूंसाठी तयार करण्यात आला आहे, हे बघून आनंद वाटला'' अशा भावना प्रथमच आलेल्या नाशिकच्या रोहन पालेकर यांनी व्यक्त केल्या. गोव्याच्या संघांचे कोकणीतून होणारे चीयरिंग आणि नागपूरच्या मुलांच्या स्टेडियम दुमदुमून सोडणाऱ्या विदर्भी आरोळ्या यामुळे क्रीडासंकुलाचे वातावरण जल्लोषपूर्ण झाले होते.







*ऑल इंडिया फुटबॉल स्पर्धा - क्षणचित्रे*

मालक, मुद्रक, प्रकाशक: श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे - २ येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले.
Visit us at https://swamisamarth.com/dervan// संपादिका: डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५,
संपादक मंडळ: सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०